बहुतांच्या कामास यावे ।
बहुतांच्या सुखी सुखावे ॥

महाराष्ट्र शासन
धाराशिव जिल्हा परिषद, धाराशिव
जिल्हाधिकारी कार्यालयासमोर, सोलापूर-छत्रपती संभाजीनगर राज्य महामार्ग क्र.211,धाराशिव 413501
दूरध्वनी 02472-226840 ईमेल ceozpdharashiv@gmail.com, CEOZP.dharashiv@maharashtra.gov.in वेब https://www.zposmanabad.gov.in


जा.क्र.जिपधा.मुकाअ.स्वीय. 86 दिनांक 14.02.2024 16

**अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी**
**यांचेस्तरावर करावयाच्या कार्यवाहीबाबत.**

## परिपत्रक

जिल्हा परिषद अंतर्गत कंत्राटदाराची वर्गवारी, काम करण्याची आर्थिक क्षमता, नोंदणीकरणास मंजूरी देण्यास सक्षम प्राधिकारी याबाबत शासन निर्णय ग्राम विकास विभाग शासन निर्णय दि.02 डिसेंबर 2016 तसेच तद्नंतर शासन स्तरावरुन वेळोवेळी मार्गदर्शक सूचना निर्गमीत करण्यात आलेल्या आहेत.

जिल्हा परिषदेमधील कामकाज पाहता ते सुलभरित्या व विहित मुदतीत होण्याच्या दृष्टीने तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी दैनंदिन विविध महत्वाच्या बैठका, व्हीडीओ कॉन्फरन्समध्ये व्यस्तता यामुळे ग्राम विकास विभागांतर्गत कंत्राटदार/ठेकेदार यांचे नोंदणीच्या कार्यवाहीबाबत अधिकार अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद यांना या परिपत्रकानुसार प्रदान करण्यात येत आहेत.

अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे अधिकार कक्षा मर्यादेवरील निविदा स्वीकृती, प्रशासकीय मान्यता इत्यादी कार्यवाही विषय बाबी गठीत करण्यात आलेल्या ठराव समितीकडे सादर करण्यात याव्यात.

निविदा स्वीकृती करुन अंतिम करण्यापूर्वी वाटाघाटी करण्याची दक्षता घ्यावी.

मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प. यांचेकडे संचिका सादर करताना वरील मुद्यांबाबत नोंद घ्यावी.

(डॉ.मैनाक घोष) भा.प्र.से.
मुख्य कार्यकारी अधिकारी
O/C जिल्हा परिषद, धाराशिव

प्रतिलिपी माहिती तथा कार्यवाहीस्तव :-

- अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प.धाराशिव.
- सर्व खाते प्रमुख, जिल्हा परिषद, धाराशिव.

***

दिनांक 16/2/24